# प्रकरण दुसरे

## (२) वारणा बझारची निर्मिती ---

(१) वारणा बझारचा उगम,

(२) वारणा बझारची आवश्यकता,

(३) वारणा बझारची उद्दिष्टेय ,

(४) वारणा बझारचे कार्यक्षेत्र.

## २:१ वारणानगरचा उगम --

सहकारी चळवळीच्या यशस्वीतेचे एक उत्तम उदाहरण म्हणून आज वारणानगरचे नांव सर्वतोमुखी झाले आहे. या उद्योग समूहातील सर्वच लहान मोठ्या संस्था ज्या त्या क्षेत्रात आदर्श ठरल्या आहेत, वारणाबझार त्या पैकी एक आहे. वारणानगरच्या उभारणीची कथा तशी स्फूर्तिदायक आहे.

उत्तमप्रतीचा गूळ म्हणजे कोल्हापूरी गूळ हे सर्वांनाच माहित आहे. ऊस पिकविणे व त्यापासून गूळ तयार करुन तो विकणे हा गेली कित्येक वर्षे या भागातील शेतकऱ्यांचा प्रमुख उद्योग होता. कारण गूळ हे हमखास पैसा कमाविणारे शेती उत्पन्न आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मात्र मिळत नसे. परंतु १९४९ हे वर्ष शेतीतून मिळणाऱ्या संपत्तीबाबतीत विक्रमी वर्ष ठरले. त्यानंतर लगेच १९५१ वर्षांच्या हंगामामध्ये गूळाचा दर अगदी खाली पडला. हा फटका सहन करणे ऊसकरी शेतकऱ्याला शक्य नव्हते. १९५१ हे काळे वर्षच उगवले त्या वर्षी गूळाची एक ढेप एक रवा रुपया सव्वा रुपयाला मिळू लागला.

गूळाच्या दरातील ही मंदी अकल्पित व आश्चर्यकारक होती. गूळाचा दर इतका उतरला होता की गुऱ्हाळ लावणंही शेतकऱ्याला परवडणार नव्हता त्यात फार मोठा तोटा सहन करावा लागणार होता. गुऱ्हाळ लावण्यालाही खर्च उत्पन्नामधून काढणे शक्य नव्हते.

गूळाच्या मंदीमुळे जर गूळ नाही तर साखर तरी व्हावी म्हणून अनेक शेतकरी जिल्ह्यातल्या साखर कारखान्यावर जाऊन थडकले. परंतु कोणताही कारखाना म्हटला तरी त्याची काही कमाल कार्यक्षमता असते आधीच कोल्हापूरात ऊस शेती जास्त त्यात गूळ न केल्याने उपलब्ध होऊ शकणारा अधिक ऊस शेवटी त्या कारखान्यालाही नवीन अनाहूत ऊसासाठी आपला दरवाजा बंद करावा लागला. दोष कारखान्याचा नव्हता, बाजारभावाचा होता. गुऱ्हाळ चालवून

उपयोग नाही. पीक तर ऊभे आणि त्याचा दुसरा काहीही उपयोग नाही , शेतक-यापुढे काय करावे ? अशी फार मोठी विवंचना होती. त्यांना कोणाच्यातरी सुयोग्य मार्गदर्शनाची जरुरी होती. अशा वेळी श्री.तात्यासाहेब कोरे यांनी याबाबतीत पुढाकार घेतला आणि आपल्या जिवलग सहका-यांच्या मदतीने चिकाटीचे प्रयत्न व अविश्रांत श्रम करुन सहकाराच्या माध्यमातून वारणा खो-याच्या सर्वांगीण विकासाचे बीजारोपण सन १९५५ साली साखर कारखान्याच्या स्वरुपात प्रत्यक्षात अवतरले. निश्चित बाजारपेठेच्या अभावी, तेजी मंदीच्या दुष्ट चक्रातून वारणा खोऱ्यातील कष्टाळू शेतक-यांना सोडविण्याची प्रथम प्रेरणा हा कारखाना सुरु करण्यामागे होती.

भागातील शेतक-यांना हमखास व योग्य उत्पन्नाची हमी मिळाली.शेतकरी वर्ग सुखावला पण तात्यासाहेब मात्र तेवढयाने सुखावले नाहीत. त्यांना आता शेतक-यांच्या सर्वांगीण उन्नतीचा ध्यास लागला.

शेतीला पूरक असे जोडधंदे उपलब्ध व्हावेत म्हणून सहकारी तत्वावरच डेअरी व पोल्ट्रीची स्थापना झाली यातूनच पुढे जरुरी प्रमाणे बँक, शेतक-यांच्या मुलांना उत्तम शिक्षण घेता यावे म्हणून बालवाडी ते महाविद्यालय पर्यन्त विविध शैक्षणिक संस्था स्थापन केल्या, व्यायाम मंडळ, वाचनालय, भगिनी मंडळ इ. संस्थाची स्थापना झाली. या सर्व उद्योगधंदामुळे वारणा परिसराच्या आर्थिक विकासाला चालना मिळाली. त्यातील संस्थाचे क्रम पुढीलप्रमाणे :---

2:1:1) <u>श्री वारणा महाविद्यालय</u> --

कला, विज्ञान आणि वाणिज्य विषयांचा अंतर्भाव असलेले वारणा महाविद्यालय सन १९६४ साली सुरु झाले. उच्च शिक्षणापासून वंचित राहिलेल्या ९० टक्के विद्यार्थ्यांची या महाविद्यालयामुळे सोय झाली. भव्य व सोईच्या इमारती सुसज्ज प्रयोग शाळा, ग्रंथालय उच्च विद्याविभूषित प्राध्यापक वर्ग विद्यार्थ्यांची वसतिगृहे, क्रिडा सवलती कलांना उत्तेजन या सा-या सुविधा या महाविद्यालयात आहेत.

महाविद्यालयाची स्थापना सन १९६४ साली त्यावेळी १२८ विद्यार्थी व १२ प्राध्यापक होते. सन १९७४ साली ९७० विद्यार्थी व ४५ प्राध्यापक आणि ५० कर्मचारी आहेत.

आज रोजी सध्या सन १९८८ मध्ये विद्यार्थी संख्या दोन हजाराच्या घरात आहे.

यातील विद्यार्थी वसतिगृहात ८५० विद्यार्थी राहातात तसेच १५० मुलींचा समावेश आहे. प्राध्यापक व कर्मचारी यांच्यासाठी निवासस्थाने म्हणून ६० क्वॉर्टर्स बांधलेले आहेत.

अशा त-हेने वारणा सहकारी साखर कारखान्याने विविध सुखसोई निर्माण केल्या आहेत. या मागील मुख्य हेतू म्हणजे कारखान्याच्या उभारणीने या भागाची आर्थिक उन्नती होणार आहे पण त्याच बरोबर या परिसराची सांस्कृतिक उन्नती होणार आहे. यासाठी या ठिकाणी एक महाविद्यालय व इतर शैक्षणिक उपक्रम सुरु करणे.

## 2:1:2) श्री वारणा कोंबडी सहकारी संघ --

कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी वर्गाला नवा किफायतशीर जोड व्यवसाय म्हणून सन १९६३ मध्ये श्री वारणा कोंबडी सहकारी संघ स्थापन केला.

जोड व्यवसायापैकी कोंबडीपालन हा ग्रामीण भागात एक प्रमुख व किफायतशीर होऊ शकणारा व्यवसाय आहे.

शेतीस जोडधंदा द्यावा या संघाच्या उद्देश्याप्रमाणे व शेतकरी बंधुंची आर्थिक उन्नती घडवून आणावी या हेतूने एक जुलै १९७० पासून संघाने सभासद बंधूना प्रत्यक्ष पाळण्यासाठी कोंबड्या दिल्या आहेत.

या कोंबडी संघाचे आवाहन जिराईत शेतकरी शेतमजूर, मध्यवर्गीय, सामान्यवर्गीय व्यक्तींना आहे. या लहान कुटुंबाना दैनंदिन ताजी अंडी खाण्यास

8201
A.

मिळावी व कोंबड्यांचा खाद्यखर्च चालावा म्हणून त्यांना लहान प्रमाणात कोंबड्याचे पिंजरे उपलब्ध करुन दिले. या योजनेखाली या संस्था ग्रामीण जनतेला उत्तम पक्षी, वैद्यकीय सेवा, पक्षी खाद्य, अंडी खरेदी विक्री इत्यादी सर्वांगीण कुक्कुट पालन सेवा उपलब्ध करुन देतात. दोन्ही फार्मवर ५० हजारावर पक्षी आहेत. एक कोटी अंड्याचे उत्पादन होते.

अशा त-हेने वारणा कोंबडी सहकारी संघ व सह्याद्री कुक्कुट पालन या सहकारी संस्थानी कुक्कुट पालनाच्या शेतीपूरक व्यवसायाचा पाया घातलेला आहे.

## २:१:३) श्री वारणा विद्या मंदिर --

या परिसरातील महाविद्यालयाची उणीव भरुन काढल्यानंतर आदर्श शिक्षणाचा पाया बालवयापासूनच घालण्याची आवश्यकता व निकड पटल्याने सन १९६६ सालापासून वारणानगर मधील नागरिकांच्या सोईसाठी शिशुविहार ही पूर्ण प्राथमिक शिक्षण देणारी अशी जोड संस्था कारखान्याने उभी केली.

सुरुवातीला या संस्थेत ४ वर्ग व १५० मुले होती. नंतर ती संख्या वाढत जाऊन ७ वर्ग व ४०० मुलांपर्यन्त गेली. आज १९८८ साली ७०० विद्यार्थ्यांचे हे प्राथमिक शिक्षण विद्यामंदिर असून यातील विद्यार्थी सातत्याने त्यांच्या पातळीवरील स्पर्धात्मक परिक्षांत यश मिळवित आहेत.

## २:१:४) वारणा सहकारी बँन्क --

श्री वारणा सहकारी साखर कारखान्यामुळे वारणा परिसरातील ऊसकरी शेतकऱ्यांचा काही आर्थिक विकास होऊ शकला. परंतु एवढ्याने काम भागणारे नव्हते. या परिसरातील इतर शेतकरी, शेतमजूर, किरकोळ व्यापार उदीम करणारे लोक, कारागीर, मागासवर्गीय मंडळी या सर्वांच्या आर्थिक विकासाच्या संदर्भात २८ फेब्रुवारी १९६६ रोजी वारणा सहकारी बँन्केची स्थापना केली.

या दुर्बल गटातील माणसांचा त्यांचा पतीचा फारसा विचार न करता भांडवल पुरविले ,आर्थिक विकास होण्यासाठी मदत केली पाहिजे हा दृष्टिकोन बँन्केने ठेवला. समाजातील जो दुर्बल घटक आहे त्यांना बँन्केने कर्ज पुरवठा केला.तसेच गरजू विद्यार्थ्यांला उच्च शिक्षणासाठी बिनव्याजी कर्ज दिले.

## 2:1:5 कामगार कल्याण --

कामगारांच्या दैनंदिन आवश्यकता भागविण्यासाठी जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी कारखान्याच्या पहिल्याच गाळप हंगामा बरोबर वारणा कामगार विविध कार्यकारी सहकारी सोसायटी स्थापन झाली. ही सोसायटी स्वस्त धान्याचे सरकारमान्य दुकान, साखर विक्री केन्द्र, लाकूड,कोळसा वखार, गॅस पुरवठा केन्द्र, पीठ गिरणी, कापड दुकान व विविध वस्तू भांडार चालवते. या शिवाय कामगारांना त्यांच्या अडचणीच्या प्रसंगी पत पुरवठाही करते. क्रीडा मंडळे, दवाखाने, उपहारगृहे, बेकरी उद्योगांना प्रोत्साहन देते. तसेच मुद्रणालय, प्लॅस्टिक कारखाना या सारखे किफायतशीर व्यवसाय कामगार सोसायटी चालविते.

## 2:1:6) अमृतनगर -- दुग्ध प्रकल्प --

वारणा परिसरातील शेतकरी, शेतमजूर व इतर आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या जनतेचा आर्थिक कायापालट करण्याचे दृष्टीने ग्रामीण भागातील गरीबी नाहीशी करण्याचे एकमेव महत्वाचे साधन म्हणून ' वारणा दूध प्रकल्प ' २० जुलै १९६८ रोजी स्थापन करण्यात आले. वारणा खो-यातील सर्व शेतक-यांना विशेषत: जिराइत शेतक-यांसाठी शेतीला किफायतशीर जोडधंदा म्हणून वारणा सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघ लि. या संस्थेस अधिक महत्व प्राप्त झाले आहे. दुग्धालयात होलमिल्क पावडर, स्कीम मिल्क पावडर, बेबी फूड, माल्टेड मिल्क कन्डेन्स्ड मिल्क, लोणी, तूप, वगैरे व मिठाया तयार करण्याचा उद्देश आहे अशा त-हेने संकलित दुधावर आधुनिक यंत्रे व तंत्रज्ञानाचे साहयाने प्रक्रिया केली जाते.

2:1:7) वारणा विद्यालय --

महाविद्यालय व प्राथमिक शिक्षणानंतर माध्यमिक शिक्षणासाठी निर्माण केलेल्या श्री वारणा विद्यालयाचा उल्लेख करता येईल.

महाविद्यालयाच्या शिक्षणाची आदर्शक् व्यवस्था चालविल्यानंतर माध्यमिक शिक्षणाची पोकळी भरुन काढणे अपरिहार्य ठरले म्हणून वारणा विद्यालयाची स्थापना सन १९६९ साली झाली. माध्यमिक शिक्षणाची वारणानगर मधील उणीव भरुन निघाली.

या विद्यालयासाठी वसतिगृहाची सोय असून या वसतिगृहात २५० विद्यार्थी आणि विद्यार्थिनीसाठी राहाण्याची सोय आहे.

प्रगत शहरामधूनही पालक आपले पाल्य शिक्षणासाठी इथ पाठविण्यास उत्सुक असतात.

2:1:8) वारणा बझार - सहकारी ग्राहक भांडार --

आखील भारतातील ग्रामीण भागातील पहिले ग्राहक भांडार म्हणून वारणा बझारची ख्याती आहे. त्याची स्थापना २ एप्रिल १९७८ साली झाली.

वारणा परिसरातील ग्राहकांच्या जीवनावश्यक गरजा माफक दरात पुरविणे आणि सातत्याने मालाचा चांगला दर्जा टिकविणे ही या भांडाराची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

2:1:9) कागद निर्मिती प्रकल्प --

भारतात सध्या कागदाची टंचाई आहे. कागदाची गरज वाढतच राहणार आहे. या गोष्टी लक्षात घेता कागद उत्पादनाची किती आवश्यकता आहे हे समजून येईल. कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांची पुढाकार घ्यावा आणि

संकल्पित कागद कारखाना कोल्हापूर जिल्हात स्थापन करावा म्हणून वारणा सहकारी साखर कारखान्याने १५ ऑगस्ट १९८३ रोजी कागद कारखाना सुरु केला.

या कारखान्यासाठी लागणारा कच्चा माल म्हणजे बगॅस, भात पिंजर, गव्हाचे काड, यापासून कागद बनविण्याचा ६ कोटी रुपयांचा प्रकल्प वारणा नगर येथे सुरु केला आहे. तसेच मोलॅसिस पासून अल्कोहोल व निरनिराळ्या वस्तू प्रेसमडपासून खते वगैरे प्रकल्प चालू करण्यात आले आहेत. त्यामुळे साखर कारखान्याच्या सभासदास आणि परिणामी ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्यास त्यांच्या ऊसाची किंमत किफायतशीरपणे मिळेल व ग्राहकांना साखर ही योग्य दरामध्ये मिळण्याची व्यवस्था होईल.

2:1:10) तंत्र शिक्षण --

विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रसारणामुळे वाढत्या संख्येने तंत्रज्ञ व कुशल कारागीर यांची मोठी गरज शासनाचे धोरण या बाबतीत दूरदृष्टी या पार्श्वभूमिवर वारणा परिसरात दोन तंत्रज्ञान संस्था सन १९८३ साली स्थापन केल्या. त्या अनुक्रमे तात्यासाहेब कोरे औद्योगिक प्रशिक्षण केन्द्र व तात्यासाहेब कोरे इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी या होत. यामध्ये डीग्री व डिप्लोमा यांची व्यवस्था केलेली आहे.

2:1:11) महिला गृह उद्योग --

वारणानगरमध्ये महिलांच्या जीवनात सहकारी तत्वावरील गृह उद्योगांचा प्रारंभ झाला. हा गृह उद्योग म्हणजे पापड तयार करण्याचा धंदा. जेवणा बरोबर थोडक्यात चवदारपणा आणण्यासाठी पापडासारखा हलका व सहज कुरकुरीत पदार्थ नाही. पापडाची लज्जत ' लिज्जत ' बनून घराघरातून न कुरकुरता कुस्करली जाऊ लागली आहे. या पापडाला मुंबई सारख्या मोठ्या शहरांमध्ये खूपच मागणी आहे.

महिला गृह उद्योग संस्थेने मानवी मूल्यांना आपल्या व्यवसायात अग्रक्रमाने स्थान दिले होते. ती तत्वे म्हणजे स्वावलंबन, श्रमाची प्रतिष्ठा, महिलांच्या फावल्या वेळेचा उत्तम रचनात्मक उपयोग या पापड उद्योगाव्दारे केला आहे.

अशा प्रकारे या विविध सहकारी प्रयत्नांतूनच समाजाची उन्नती करण्याच्या प्रकल्पाची रचना होऊ लागली आहे.

वारणानगरमध्ये हल्ली जवळ जवळ चार हजारांची नियमित वस्ती आहे. कारखाना हंगामामध्ये हंगामी कामगार वाहतूक सेवक आणि वारणा महाविद्यालयातील विद्यार्थी वर्ग धरता ही वस्ती जवळ जवळ आठ हजारापर्यन्त सहज जाते.

महाविद्यालयाची वेगळी वसाहत, पलिकडे अमृतनगर, निवृत्ती कॉलनी, मध्यवर्ती कामगार वसाहत या सर्वांच्या सार्वजनिक मनोरंजनासाठी काही चित्रपट कांही नाटके नामवंत विव्दानांची व्याख्याने या प्रकारचे आयोजन होत असते.

कारखाना परिसर १६१ एकरांवर पसरलेला आहे. कारखान्याचे सभासद, भागातील कार्यकर्ते आणि वारणानगरला प्रसंगानिमित्ते भेट देण्यासाठी येणारे नेते शासकीय अधिकारी, लेखक कलावंत, गायक यांच्या वस्तीसाठी शेतकरी निवास व गेस्ट हाऊस अतिथि गृह यांची ही रचना केलेली आहे.

तसेच कामगारांच्या आरोग्यवर्धनासाठी व रोग निवारणासाठी एक कॉटेज हॉस्पिटल वारणानगरमध्ये आहे. कारखान्याला जो फायदा होईल तो फायदा उत्तम इमारती, आदर्श घरे, दवाखाना, शाळा प्रशाला, महाविद्यालय यात गुंतवण्यासाठी कारखान्याचे कार्यकर्ते उत्सुक असतात.

सध्या जेथे वारणानगर आहे तो मुलुख आधी कसा होता हे कल्पना करुनही नवागताला कळणार नाही. अत्यंत उग्र आणि रणरणती उन्हे एका मुरमाड माळाला अविरत तापवत होती. शेतीजमीण म्हणाल तर नुसते वाढलेले तण होते. जिथे कोरांटी व बारकी झुडप खाण्यासाठी येणाऱ्या मेढयांचे कळप दिसत.

असा हा वारणानगरचा मूळ इतिहास आहे. याच वारणानगरमध्ये कारखान्यामुळे ५०-६० गावांचा मुलुख नवे रुप धारण करीत आहे. नव्या युगाच्या प्रकाशाशी हातमिळवणी करीत आहे. हे सर्व पाहिल्यावर असे वाटते की, नव्या राष्ट्राचा ज्या ठिकाणी जन्म होत आहे त्या ठिकाणापैकी हे एक आहे.

२:२ वारणा बझारची आवश्यकता --

वारणा साखर कारखान्याने कारखान्यां बरोबर शेतीला पुरक असे अनेक उद्योग सुरु केले. त्यामुळे हा भाग विकसित झाला. शेतकऱ्यांच्या हातात पैसा आला. मात्र त्याला नित्योपयोगी वस्तूसाठी शहराकडे धाव घ्यायला लागत असे किंवा ग्रामीण भागातील व्यापाऱ्याकडून वस्तू महाग किंमतीत खरेदी कराव्या लागत. त्याला स्वच्छ, निर्भेळ व स्वरुपात इथच वस्तू घायची व्यवस्था आपण केली तर त्यांना उपयोग होईल या भूमिकेतून या ग्राहक भांडाराची कल्पना कारखान्याचे अध्यक्ष तात्यासाहेब कोरे यांना सूचली.

याच वेळी सुदैवाने केन्द्र सरकारतर्फे ग्रामीण भागात सहकारी भांडार काढण्याच्यादृष्टीने अधिकारी व तंज्ञाची पाहणी सुरु होती. त्यांनी त्यादृष्टीने वारणा विभागाची पाहणी करावी यासाठी साखर कारखान्याच्या चालकानी जरुर तो पुढाकार घेतला आणि त्यात यश येऊन वारणानगर येथे सकल वस्तू भांडार काढण्याच्यादृष्टीने हालचालीस सुरुवात झाली. त्यावेळेपर्यन्त सहकारी वस्तू भांडारे फक्त शहरातून निघाली होती. ग्रामीण भागात होणारे हे भांडार देशातील पहिलेच ठरणार होते.

ही योजना एक आव्हान समजून वारणा सहकारी साखर कारखान्याच्या चालकांनी ते स्वीकारले आणि नैशनल को.ऑप.कंझ्युमर्स फेडरेशन लि., दिल्ली च्या तंज्ञाचे देखरेखीखाली सर्व सोईनी युक्त योजनाबध्द व अद्यावत अशी वास्तू आकाराला आली. २ एप्रिल १९७८ रोजी समारंभपूर्वक वारणा बझारची सुरुवात परिश्रमपूर्वक हा प्रयोग यशस्वी करुन दाखविला. एक आदर्श ग्राहक भांडार म्हणून देशभरातील

लोक ते पाहायला येतात. वारणा परिसरातील ग्राहकांच्या जीवनावश्यक गरजा माफक दरात पुरविणे आणि सातत्याने मालाचा चांगला दर्जा टिकविणे ही या भांडाराची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

वारणानगरमध्ये हल्ली जवळ जवळ चार हजारांची नियमित वस्ती आहे. कारखाना हंगामामध्ये हंगामी कामगार, वाहतूक सेवक आणि वारणा महाविद्यालयातील विद्यार्थी धरला ही वस्ती जवळ जवळ आठ हजार पर्यन्त सहज जाते. महाविद्यालयाची वेगळी वसाहत, पलिकडे अमृतनगर, निवृत्ती कॉलनी, मध्यवर्ती कामगार वसाहत, श्री वारणा विद्या मंदिर, वारणा विद्यालय, तंत्र शिक्षण, महिलागृह उद्योग, वारणानगर हे एक महत्वाचे शिक्षण केन्द्र झाले आहे. बालवाडीपासून ते कला, शास्त्र, वाणिज्य शाखा असलेले कॉलेज, इंजिनियरिंगचे डिप्लोमा व डिग्री कॉलेज, आय.टी.आय. वगैरे सर्व बाजूने युक्त असा हा समूह आहे. या ठिकाणी प्रत्येक विभागातील लोकांच्या भिन्न गरजा असल्याने या गरजांची पूर्तता होत नसे. शिवाय कामगारांच्या राहाण्याच्या सोईसाठी उत्तम इमारती, आदर्श घरे, दवाखाना, शाळा, प्रशाला, महाविद्यालय इत्यादी सोई सुविधा असल्याने या परिसरातील लोकसंख्येत दिवसेंदिवस वाढ होत गेली. तसा लोकांच्या अनेक गरजा वाढू लागल्या. या वाढत्या गरजांची मागणी कोणत्याही खाजगी व्यापारी पूर्तता करु शकत नव्हते म्हणून या परिसरातील इतर भागातील लोकांना लागणाऱ्या जीवनोपयोगी वस्तू योग्य दरात, योग्य वजन मापात निर्भेळ व चोख अशा मिळाव्यात तसेच आर्थिक दृष्ट्या गटातील लोकांना संरक्षण देणे, दैनंदिन गरजेच्या वस्तू पुरविणे व खाजगी व्यापाऱ्यांच्या विक्री व्यवहाराचे गैर प्रकाराला आळा घालणे या उद्देश्याने वारणा बझार सुरु केले, त्यामुळे एकाच छत्राच्या नियंत्रणाखाली विविध वस्तूंच्या गरजांची पूर्तता करणे शक्य झाले.

## २:३ वारणा बझारची उद्दिष्टये --

वारणा बझार ग्राहक मंडळाची उद्दिष्टये --

(१) धाऊक वस्तू मिळवून ग्राहक भांडारांना, सभासद ग्राहक, आणि इतर ग्राहक, आणि त्यांच्या संघटित संस्थांना धाऊक किंवा किरकोळ पध्दतीने वस्तूंचा पुरवठा करणे.

(२) क्रयविक्रय, प्रक्रिया आणि औद्योगिक सहकारी संस्थाकडून वस्तूंचा पुरवठा मिळवून सभासदांना देणे.

(३) ग्राहक सहकारी सोसायट्यांच्या उद्योग व्यापारावर कोणताही प्रतिकूल परिणाम न होता वस्तूंची प्रक्रिया करणे आणि माल तयार करणेची जबाबदारी घेणे.

(४) शासनाला आवश्यक वाटल्यास शासनाचे प्रतिनिधी म्हणून काम करणे आणि उपभोग्य वस्तू, तसेच ज्या वस्तूंची टंचाई आहे अशा वस्तूंचे वाटप नियंत्रित पध्दतीने करणे.

(५) महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यातील कलम २० अन्वये दोन किंवा अधिक सहकारी संस्थाचे भागीदारी करुन विशिष्ठ व्यवसाय हाती घेणे.

(६) ग्राहकांच्या अत्यावश्यक सेवा सुविधांचा विचार करुन त्याप्रमाणे तरतुद करणे.

(७) प्राथमिक ग्राहक भांडाराच्या आर्थिक उन्नतीसाठी कर्ज योजना वित्त संस्थेशी जोडण्यासंबंधीची शिफारस करणे.

(८) प्राथमिक भांडाराच्या सभासदांच्या कामावर नियंत्रण ठेवणे आणि त्यांचे व्यवस्थापन व उद्योग व्यापाराच्या तंत्रज्ञानाबद्दल सल्ला देणे.

(९) स्थानिक पातळीवरील शाखांच्या सभासदांना सल्ला देणे.

(१०) सभासदाना परस्परांमध्ये मदतीने उत्तेजन देणे, काटकसर करणे आणि ग्राहक वस्तूचा पुरवठा वाढविण्यासाठी त्यांच्या ठेवीमध्ये वाढ घडवून आणणे.

(११) संलग्न सहकारी प्राथमिक संस्थांचे प्रशासक म्हणून कार्य करणे व गरज वाटल्यास सोसायटी व सभासद प्राथमिक संस्था या दोहोना मान्य अशा अटीवर संस्थांचे व्यवस्थापन आपल्या हाती घेणे.

(१२) ग्राहक मंडळ व ग्राहकांचे हीत विचारात घेता केन्द्र व राज्य शासनाच्या धोरणाप्रमाणे जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्याचे काम हाती घेवून अंमलात आणणे.

(१३) उद्दीष्टये प्राप्त करण्यासाठी आवश्यक किंवा अनावश्यक गोष्टींचा विचार करणे.

२:४ वारणा बझारचे कार्यक्षेत्र --

वारणानगर हे वारणानदीच्या दक्षिण तटावर, पन्हाळ्याच्या पायथ्याशी ५-६ मैल अंतरावर आहे. तसेच कोल्हापूरच्या अलिकडे पंधरा मैलावरील पुणे-बेंगलोर राष्ट्रीय हमरस्त्याच्या पूर्वेस वाठार फाट्यावरुन आत आठ मैल अंतरावर वारणानगर स्थापन करण्यात आले आहे.

वारणा बझारचे एकूण क्षेत्रफळ ९००० चौ.फूट असून त्यातील प्रत्येक विभागात वेगवेगळ्या प्रमाणात स्क्वेअर फूट जागा विभागून देण्यात आली आहे, ती पुढीलप्रमाणे ---

(१) औषध --

औषध या विभागासाठी २३० बाय ४०५ इतके स्क्वेअर फूट जागा देण्यात आली आहे. त्यामध्ये तयार कपडे असून जास्त जागा मिळाल्यामुळे नवनवीन डिस्पले स्टॅन्डसमुळे विभाग आकर्षक बनला आहे.

(२) टॉवेल व बेडशीट --

या विभागासाठी २३० बाय ५३० चौ.फूट जागा देण्यात आली आहे.

(३) साडी --

या विभागासाठी २३० बाय ५३० चौ.फू.जागा देण्यात आली आहे. या विभागाव्दारा वैशिष्ट्यपूर्ण साड्या ग्राहकांना उपलब्ध करुन दिल्या जातात.

(४) रेडीमेड --

या विभागासाठी २३० बाय ५३० चौ.फूट जागा देण्यात आली आहे.

(५) कॉसमेटीज --

या विभागासाठी २३० बाय १२० चौ.फूट जागा दिलेली आहे. या वस्तूच्या मागणीचा विचार करून जागा ठरविण्यात आली आहे.

(६) पादत्राणे --

या विभागासाठी २३० बाय १२० चौ.फूट जागा दिलेली आहे. स्थानिक चर्मकारांनी तयार केलेली चप्पल्स या विभागाकडून विक्री केली जाते.

(७) स्वयसेवा --

या विभागासाठी २३० बाय १०६० चौ.फूट जागा देण्यात आली आहे. या विभागामध्ये जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केल्याने ग्राहकांची मागणी फार मोठ्या प्रमाणात असल्याने या विभागासाठी सर्वांत जास्त चौ.फूट जागा उपलब्ध करून दिली आहे.

(८) गृहउपयोगी --

या विभागासाठी २३० बाय १०६० चौ.फूट जागा देण्यात आली आहे. या विभागास ही जास्त महत्व दिले असल्याने जागा वाढवून देण्यात आली.

(९) पुस्तके व स्टेशनरी --

या विभागासाठी २३० बाय ५३९ चौ.फूट जागा देण्यात आली आहे. खेळणी व क्रिडा साहित्य ठेवले असून हा विभाग लहान मुला-मुलींनी सतत गजबजलेला असतो.

(१०) शेती अवजारे --

या विभागासाठी २३० बाय ९२० चौ.फूट जागा देण्यात आली आहे. शेती अवजारे व खते बियाणे यांचा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात पुरवठा केला जातो.


(११) सायकल --

या विभागासाठी २३० बाय ३९० चौ.फूट जागा देण्यात आली आहे.

(१२) गोडावून --

या विभागासाठी २३० बाय २४०० चौ.फूट जागा देण्यात आली आहे. माल पुरवठा करण्याची जबाबदारी गोडावूनवर असल्याने जागा वाढवून देण्यात आली आहे.

ग्रामीण परिसर लक्षात घेऊन त्यांच्या गरजा भागविणारा सर्व प्रकारचा माल येथे उपलब्ध करण्यात आला आहे.



वारणा कारखान्या एकूण कार्यक्षेत्रातील गावांचा नकाशा